CMYK

बीड । मंगळवार
१४.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २७८
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 




# वाल्मीक कराडवर 'मकोका' लावण्याच्या मागणीसाठी धनंजय देशमुख यांच्यासह गावकरी पाण्याच्या टाकीवर

## मनोज जरांगे यांच्या विनंतीनंतर आंदोलन मागे

केज, (प्रतिनिधी): - सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाशी निगडीत खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यासाठी मस्साजोगचे ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झालेत. मयत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी ग्रामस्थांसह गावातील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन सुरू करत स्वतःला संपवून घेण्याचा इशारा दिला आहे. धनंजय देशमुख यांनी आंदोलन करताना पाण्याच्या टाकीची शिडी काढून टाकली. मस्साजोगच्या ग्रामस्थांनी आज मोबाईलच्या टॉवरवर चढून आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. पण पोलिसांनी या टॉवरच्या भोवती प्रचंड बंदोबस्त लावल्यामुळे या ग्रामस्थांनी अचानक पाण्याच्या टाकीवर आंदोलन करण्यात आले.ङ्गङ्गखंडणीमुळे माझ्या भावाचा खून झाला. त्यामुळे खंडणीमधील गुन्हेगारांवर हत्येचा गुन्हा दाखल केला जावा. पुरावे असूनही त्यांना या प्रकरणी त्यांना आरोपी केले जात नाही. पोलिसांना पुरावे सांगितलेत, कोणी कोणाला कसा फोन केला अशा बऱ्याच घटना पोलिसांना सांगितल्यात. पण त्याचा कोणताही फायदा ▶▶पान २ वर




## खंडणी अन् हत्येचे आरोपी एकच-मनोज जरांगे



बीडच्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी सोमवारी पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर ▶▶पान २ वर

## मुख्यमंत्र्यांचा एसपी-सीआयडी अधिकाऱ्यांना फोन



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे एसपी आणि सीआयडी अधिकाऱ्यांना फोन केला असल्याची माहिती समोर आली आहे. एकही आरोपी सुटता कामा नये अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या आहेत. तसेच कुठलीही दयामाया कोणाला दाखवू नका, असेही देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. धनंजय देशमुख यांच्या टाकीवर चढून केलेल्या आंदोलनानंतर देवेंद्र फडणवीस यांनी बीडच्या एसपींशी संपर्क केला असल्याचे बोलले जात आहे. संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर महाराष्ट्रातील वातावरण संपूर्णपणे ढवळून निघाले आहे. त्यात संतोष देशमुख ▶▶पान २ वर

## जबरी चोरी करणारे चोरटे अवघ्या काही तासांत अटकेत



कडा, (प्रतिनिधी):-जबरी चोरी करून सोन्या चांदीच्या दागिन्यासह रोख रक्कम चोरीला गेल्याचा गुन्हा अंभोरा पोलिसात दाखल होताच पोलिसांनी तपासाचे चक्रे फिरवत अवघ्या सहा तासांत पिंपळा परिसरातून आज (दि. १३) पहाटे तीन चोरट्यांना अटक केली. तर एकजण पसार झाला. विशेष म्हणजे, आरोपींमध्ये तीन सख्खा भावांचा समावेश आहे. यातील एक अल्पवयीन आहे. अनेक गुन्हे अंगावर घेऊन फिरणाऱ्या आरोपींच्या चोरीनंतर अवघ्या काही तासांत मुसक्या आवळल्याने अंभोरा पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. अधिक माहिती अशी कि,आष्टी तालुक्यातील हिवरा येथील बापू मच्छिंद्र लगड यांच्या घरी (दि. १२) जानेवारीच्या मध्यरात्री जबरी चोरी करून घरातील सोन्या चांदीच्या दागिन्यासह रोख रक्कम चोरीला गेल्याची घटना घडली होती. अंभोरा पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध त्याच रात्री गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तपास सुरू केला. गुप्तवार्तावरून पिंपळा परिसरात सापळा लावला. सोमवारी पहाटे पोलिसांना तीन चोरटे हाती लागले तर एकजण पसार झाला. आरोपींमध्ये तीन सख्खा भावांचा समावेश असून एक भाऊ अल्पवयीन आहे. ही कामगिरी पोलिस अधीक्षक नवनवीन कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हानपुडे याच्या मार्गदर्शनाखाली अंभोरा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे, मनोजकुमार खंडागळे, बाबुराव तांदळे, लुईस पवार, पोलीस अंमलदार शिवदास केदार, सुदाम पैठणे, अमोल शिरसाट, वाहन चालक प्रकाश पडवळ यांनी केली.

## धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर वाल्मीक कराड आणि पोलिसांची बैठक

### खासदार बजरंग सोनवणे यांचा गंभीर आरोप



बीड, (प्रतिनिधी):-मंत्री धनंजय मुंडे यांच्या बंगल्यावर वाल्मीक कराड आणि पोलिस अधिकाऱ्याची बैठक झाली असल्याचा गंभीर आरोप बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केला आहे. या पूर्वी आमदार सुरेश धस यांनी देखील धनंजय मुंडे यांच्या बंगल्यावर बैठक झाल्याचा आरोप केला होता. खून प्रकरण आणि खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर ही बैठक झाली असल्याचा आरोप बजरंग सोनवणे यांनी केला आहे. खासदार बजरंग सोनवणे म्हणाले, मस्साजोग सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडानंतर मी पहिल्याच बाईटमध्ये मीडियाला म्हटले होते की, तिसऱ्या आरोपींचं कनेक्शन धाराशिवमार्गे पुण्याला लागत आहे का बघा, कारण माझ्या बोलण्यामागे काही लॉजिक होते. आज हा आरोपी धाराशिवमार्गे पुण्याला गेल्याचे सापडले. खंडणीतील आरोपी पुण्याला सरेंडर होतो, तो म्हणतो मी ▶▶पान २ वर



## ३२ वर्षीय तरूणाची आत्महत्या

बीड, (प्रतिनिधी): - शहरातील लक्ष्मण नगर लेंडी रोड भागातील रहिवाशी श्रीराम कचरू गजदीवे (वय ३२) यांनी राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना आज (दि. १३) रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. गजदीवे यांनी आत्महत्या का केली ? याचे कारण मात्र समजू शकले नाही.

## धनंजय मुंडे-वाल्मिक कराडांची सह्याद्रीवर डील,नोटा मोजतानाचे फोटो

### धनुभाऊंनी राजीनामा दिलाच पाहिजे-संदीप क्षीरसागर



बीड, (प्रतिनिधी):-धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्याशिवाय वाल्मिक कराड याच्यावर कारवाई होणार नाही. धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड हे मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर डील करण्यासाठी गेले होते. याठिकाणी नोटा मोजतानाचे त्यांचे फोटो समोर आले आहेत, असे वक्तव्य बीड शहरचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी केले. मी पहिल्या दिवसापासून सांगतोय, संतोष देशमुख हत्याप्रकरणाचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड आहे. सगळ्या लोकांचे सीडीआर तपासल्यास ही गोष्टी समोर येईल. मात्र, वाल्मिक कराड यांच्यावर हत्येचे कटकारस्थान रचल्याप्रकरणी ३०२ चा गुन्हा दाखल का केला जात नाही, असा सवाल संदीप क्षीरसागर यांनी उपस्थित केला. संतोष देशमुखांचा एक मारेकरी फरार आहे. धनंजय मुंडे मंत्री असल्यामुळे हा विषय होतोय. सह्याद्री अतिथीगृहावर नोटा मोजतानाचे फोटो समोर आले आहेत. सह्याद्रीसारख्या ठिकाणीही वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे डिलिंग करण्यासाठी बसतात. यावरुन तुम्हाला सगळ्या प्रकाराची कल्पना येईल. नैतिकतेच्या ▶▶पान २ वर

## विष्णू चाटेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी



बीड, (प्रतिनिधी): - मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील मुख्य आरोपी विष्णू चाटे याला आज केज न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने विष्णू चाटेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी केज न्यायालयाने विष्णू चाटेची दोन दिवसांच्या सीआयडी कोठडीत रवानगी केली होती. त्याची सीआयडी कोठडी संपल्याने त्याला आज केज कोर्टात हजर करण्यात आले होते. आता त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला आज ३४ दिवस उलटून गेले आहेत. या काळात पोलिसांनी आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणहून ताब्यात घेतले. विष्णू चाटे हा ▶▶पान २ वर

काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाची सूत्र माजी मुख्यमंत्र्यांच्या हाती जाणार?

## नाना पटोलेंना डच्चू ?



मुंबई, (वृत्तसेवा):-लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला मोठं यश मिळालं होतं, राज्यात सर्वाधिक जागा काँग्रेसनं जिंकल्या होत्या. मात्र दुसरीकडे महायुतीला मोठा फटका बसला होता. अनेक दिग्गज उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभेत महाविकास आघाडीचा सपाटून पराभव झाला. महाविकास आघाडीचे तीनही पक्ष मिळून केवळ ५० जागाच जिंकता आल्या, ज्यामध्ये शिवसेना ठाकरे गटानं २०, काँग्रेसनं १६ तर राष्ट्रवादी शरद पवार गटानं केवळ १० जागा जिंकल्या. विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष बदलणार असल्याची चर्चा सुरू झाली होती, आता याबाबत मोठी बातमी समोर येत आहे. नाना पटोले हे काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देऊ शकतात. काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नावाची चर्चा सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. समोर आलेल्या माहितीनुसार काँग्रेस हायकमांडकडून प्रदेशाध्य पदासाठी पृथ्वीराज चव्हाण यांच्या नावाला ग्रीन सिग्नल मिळाला आहे. पृथ्वीराज चव्हाण दिल्लीच्या दिशेने रवाना देखील झाले आहेत. सातारा जिल्ह्याचे सुपुत्र आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना काँग्रेस हाय ▶▶पान २ वर

## शहरातील दोन्ही राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडले

### खड्ड्यांमुळे अपघात तर धुळीमुळे आरोग्य धोक्यात; स्थानिक लोकप्रतिनिधींनींच्या दुर्लक्षामुळे थेट केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरींना सामाजिक कार्यकर्त्यांचे साकडे-डॉ.गणेश ढवळे



बीड, (प्रतिनिधी) :-बीड शहरातुन जाणा-या बीड ते अहिल्यानगर आणि धुळे ते सोलापूर दोन्ही राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडले असुन जागोजागी खोदलेल्या खड्ड्यांमुळे अपघात तर धुळीमुळे नागरीकांना श्वसनाचे विकार जडले असुन बीडकरांचे आरोग्य धोक्यात आहे.स्थानिक लोकप्रतिनिधींनींचे याकडे दुर्लक्ष असुन वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुधारणा न झाल्याने अखेर आज दि.१३ सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याभोवती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रतिमेची महाआरती करत आपणच या रस्ते कामांकडे लक्ष द्यावे असे साकडं घालत लक्ष्यवेधी आंदोलन केले. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत नितीन गडकरी, प्रकल्प संचालक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे,रामनाथ खोड, सुदाम तांदळे,शेख मुबीन, शेख मुस्ताक,शिवशर्मा शेलार, बप्पासाहेब पवार , बीड जिल्हाध्यक्ष आप,माजी सैनिक अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष( इंटक) रामधन जमाले, बाळासाहेब मोरे, ▶▶पान २ वर




CMYK

## फेकुचंदांचा फाल्गुनोत्सव!




सध्या समाजमाध्यमात 'एन्रॉन एग'ची ध्वनिचित्रफीत चांगलीच लोकप्रिय झालेली आहे. बुडीत खात्यात गेलेल्या 'एन्रॉन' कंपनीचे पुनरुज्जीवन होत असून या कंपनीने आता घरोघर वापरता येईल अशी अंडाकृती अणुभट्टी तयार केली असल्याचे सादरीकरण या ध्वनिचित्रफितीत आहे. घरघंटीप्रमाणे आता घरभट्टी. फक्त ती आण्विक इतकेच. ती एकदा सुरू केली सलग दहा वर्षे त्यातून अखंड वीजनिर्मिती कशी होते आणि घराघरांची वीज बिले कशी वाचतात हे त्यातून समजते. ही ध्वनिचित्रफीत इतकी लोकप्रिय झाली की अनेक शहाण्यासुरत्यांनी ती आपापल्या घरांत कशी बसवता येईल याची तपासणी सुरू केली आणि काहींनी तर 'एन्रॉन'च्या रिबेका मार्क यांच्या आठवणी जागवल्या. या ध्वनिचित्रफितीतील माहिती, या अशा घरभट्ट्या विकसित करण्याचे तंत्रज्ञांचे कौशल्य, तिचे 'एन्रॉन' अधिकाऱ्यांनी केलेले सुलभ सादरीकरण सारेच उत्तम आणि निर्दोष. त्रुटी फक्त एकच. ती फेक आहे. ही ध्वनिचित्रफीत इतक्या बेमालूमपणे बनवलेली आहे आणि भलेभले आश्चर्यचकित होत असले तरी ती पूर्ण बनावट आहे आणि समाजमाध्यमी रिकामटेकड्यांची फिरकी घेण्यासाठी ती तयार करण्यात आलेली आहे. जगातील अनेक नामांकित 'फॅक्टचेकर्स'नी ही ध्वनिचित्रफीत बनावट असल्याचे उघड केले. ही अशी ध्वनिचित्रफीत मनोरंजन म्हणून ठीक. पण विषय गंभीर असेल तर? सद्या:स्थितीत समाजमाध्यमी फोलपटांवर बौद्धिक गुजराण करणारा वर्ग प्रचंड प्रमाणावर वाढलेला असून तो हे सर्व गांभीर्याने घेतो. केस काळे आणि लांब होतात म्हणून रिकाम्या वेळात दोन्ही हातांची नखे एकमेकांवर घासत बसणारे, हृदयविकार टाळता येतो म्हणून तृतीयपंथीयांच्या पद्धतीने टाळ्या वाजवणारे, प्रभातसमयी उद्यानांत विविध भिकार घटकांचा रस पिणारे इत्यादी उदाहरणे आसपास पाहिल्यास या सत्याची प्रचीती येईल. तरीही यात कोविडची काळी सावली आपल्यावर पडू नये म्हणून घरातल्या ताटवाट्या बडवणाऱ्या आणि दिवे घालवून अंधारात बसणाऱ्या बिनडोकांचा समावेश नाही. तो केल्यास समाजमाध्यमी मलमूत्रावर पोसल्या गेलेल्यांची संख्या किती तरी अधिक भरेल. एरवी या अर्धवटरावांकडे दुर्लक्ष करणे हेच शहाणपण हे खरे. तथापि 'फेसबुक'कर्त्या 'मेटा' कंपनीने यापुढे 'फॅक्टचेक' थांबवण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे असत्यावतारी अर्धवटरावांची संख्या अतोनात वाढण्याचा धोका असल्यामुळे या विषयावर भाष्य करणे अगत्याचे ठरते. समाजमाध्यमी जीवजंतू तीन घटकांवर पोसले जातात. फेसबुक, आताचे 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) आणि तिसरे इन्स्टाग्राम. यांतील फेसबुक आणि ट्विटर या दोन्हीही माध्यमांनी 'फॅक्टचेकर्स'ना तिलांजली दिली असून याचा अर्थ तेथे कोणालाही काहीही लिहिण्यास/ पसरवण्यास यापुढे मुक्तद्वार असेल. अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारखा फेकुत्तम निवडला जात असताना या दोन कंपन्यांनी फॅक्टचेकिंगला मूठमाती देणे हे या दोन कंपन्या आणि अमेरिकी अध्यक्ष या दोघांबाबतही भाष्य करणारे ठरते. याचा अर्थ खोटेपणा आणि खोटेपणा हाच या उभयतांचा आधार. ही अशी सत्यास तिलांजली देण्याची गरज या उभयतांस आताच का वाटावी? 'अभिव्यक्तिस्वातंत्र्य' असे शुचिर्भूत उत्तर या दोघांकडून दिले जाते. पण अभिव्यक्तिस्वातंत्र्य याचा अर्थ वाटेल ते पसरवण्याची मुभा असा होत नाही. निवडणुकीच्या प्रचारात ट्रम्प यांनी अमेरिकेतील स्थलांतरित हे स्थानिक नागरिकांचे पाळीव कुत्रे-मांजरी खात असल्याचे विधान केले. ते १०० टक्के खोटे होते. अलीकडे त्यांनी युरोपीय देश आणि अमेरिका यांच्यातील व्यापार संबंधांबाबतही असेच दणकून काहीएक भाष्य केले. फॅक्टचेकर्सनी यातील खोटेपणा लगेच उघड केला. पण यापुढे 'फेसबुक' हा खरेखोटेपणा सिद्ध करण्याच्या फंदात पडणार नाही. 'एक्स'च्या इलॉन मस्कने तर त्याच्याही पुढची पायरी गाठली. त्याच्या 'एक्स'वर जास्तीत जास्त वाचल्या जाणाऱ्या, पसरवल्या जाणाऱ्या पोस्ट्सना तो यापुढे पैसे देणार. जगात प्रगतीच्या कोणत्याही टप्प्यावर गंगेपेक्षा गटारगंगेत डुंबणाऱ्यांची, ज्ञानेश्वरीपेक्षा अज्ञानेश्वरीत रुची घेणाऱ्यांची संख्या नेहमीच जास्त असते. त्यामुळे 'एक्स'वर काही बुद्धिगम्य, मूलभूत असे काही लिहिणाऱ्यांपेक्षा आचरट, बिनडोक आणि खोटे लिहिले गेलेलेच अधिक वाचले जाईल आणि अधिकाधिक पसरवले जाईल. आता त्यांस मस्क मोबदला देईल. ट्रम्प यांच्या फेरउदयाआधी 'एक्स'वरही फॅक्टचेकिंग होत असे. मस्क याने ते दूर केले. याचा अर्थ सरळ आहे. वाईटसाईट, अश्लील आणि असत्य, नामीपेक्षा बदनामीकारक लिहिणाऱ्यांस यापुढे 'एक्स'कडून थेट उत्तेजन मिळेल. ते दुहेरी असेल. म्हणजे कोणाहीविषयी काहीही लिहा, ते पसरवा आणि पैसे मिळवा. पूर्वी आपल्याकडे ''देवीचा रोगी कळवा आणि हजार रुपये मिळवा'' अशा प्रकारची मोहीम सरकारने चालवली होती. यापुढे लवकरच ''फेसबुक आणि एक्स यावर सत्य काय आहे ते कळवा आणि हजार रुपये मिळवा'' असा प्रचार करावा लागेल. ट्रम्प यांच्यासमोर या दोन कंपन्यांनी घातलेले हे सपशेल लोटांगण. यातील 'एक्स'चा प्रमुख हा तर टम्प यांचा पापसाथी. 'मेटा'च्या झकरबर्ग याचे असे नव्हते. तो अलिप्त असल्याचे दाखवत तरी होता. आता हा देखावाही त्याने सोडला. या दोन कंपन्या आता प्रोपगंडा यंत्रणेचा अधिकृत भाग बनतील. त्यांना आतापर्यंत दूर राखले होते ते अमेरिकी राजकारणाने, ही बाब लक्षात घ्यावी अशी. म्हणजे २०२० च्या निवडणुकीत ट्रम्प पराभूत झाले, डेमॉक्रॅटिक पक्षाचे जो बायडेन विजयी झाले आणि या दोन कंपन्यांनी फॅक्ट चेकर्सना अधिक महत्त्व द्यायला सुरुवात केली. त्याआधी २०१६ सालचा ट्रम्प यांचा विजय आणि इंग्लंडमध्ये झालेले ब्रेग्झिट या दोन घटनांशी असलेला असत्याचा संबंध उघड झाला होता. खोटा प्रचार, प्रोपगंडा किती विध्वंसक असू शकतो हे त्यातून दिसून आले होते. त्यामुळे समाजमाध्यमांच्या या नतद्रष्ट व्यवसाय प्रारूपाविषयी मोठा जनक्षोभ निर्माण झाला आणि त्यातून 'फॅक्टचेकिंग'ची गरज निर्माण झाली. 'फेसबुक'ने आपला मंच तटस्थ फॅक्टचेकर्सना उपलब्ध करून दिला. त्यामुळे काही प्रमाणात का असेना पण अफवा प्रसारास आळा बसला. कारण एकदा एखादी बातमी/ घटना फॅक्टचेकर्सनी खोटी ठरवली की ती बातम्यांच्या रांगेत तळास जाईल अशी व्यवस्था केली गेली. तरीही कोणी ती पाठवू पाहात असेल तर त्यास ''हा मजकूर असत्य आहे'' असा इशारा या माध्यमांतून दिला जात असे. आता ही व्यवस्था नसेल. या दोन्हीही कंपन्यांनी फॅक्टचेकिंग न करण्याचे ठरवले असल्यामुळे यापुढे ही दोन्ही माध्यमे असत्यवाद्यांच्या चावड्या बनतील यात शंका नाही. पण 'फेसबुक'बाबत त्यातल्या त्यात एक दिलासा. तो म्हणजे त्यास हे असे करण्याची मुभा युरोपीय देशांत असणार नाही. समाजमाध्यमी कंपन्यांबाबत युरोपीय देश कमालीचे सजग आहेत. या कंपन्यांची वाटेल ती थेरे त्या देशांत चालू दिली जात नाहीत, याची पूर्ण कल्पना असल्यानेच 'मेटा'च्या झकरबर्ग याने फॅक्टचेकर्स रद्द करण्याचा निर्णय तूर्त अमेरिकेपुरताच घेतला. कारण युरोपीय बडग्याची कल्पना त्याला आहे. अमेरिकेपेक्षा युरोपनेच या 'मेटा'सारख्या बेजबाबदार कंपन्यांचा जीव आपल्या तगड्या नियमनाने अनेकदा 'मेटा'कुटीस आणला. या पार्श्वभूमीवर भारतासारख्या देशानेही याबाबत आधीपासूनच सावधगिरी बाळगावी आणि अमेरिकेतील असत्यप्रसाराची थेरे येथे चालणार नाहीत, अशी स्वच्छ भूमिका घ्यावी. अन्यथा या समाजमाध्यमांमुळे आपले समाजजीवन फेकुचंदांच्या फाल्गुनोत्सवात अधिकच फिसकटेल.

# सरपंच संतोष देशमुख प्रकरण अतिशय दुर्दैवी



मुंबई, (वृत्तसेवा):-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली. ''संतोष देशमुख प्रकरण अतिशय दुर्दैवी आहे. माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना आहे. अतिशय निर्घृणपणे हत्या झाली आहे. शासनाने हे प्रकरण गांभीर्याने घेतलं आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः सीआयडी, एसआयटी लावलेली आहे. यातील एकही आरोपी सुटणार नाहीत. कोणाशीही लागेबांधे असले तरी सरकार कुणाला पाठीशी घालणार नाही. आरोपींना फाशी सारखी शिक्षा द्यावी, अशी विनंती न्यायालयाकडे केली जाणार आहे. फास्टट्रॅकवर हा खटला चालवला जाणार आहे. भाजप आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण फार गांभीर्याने घेतले. एखाद्या सरपंचाची निर्घृण हत्या होते हे अत्यंत दुर्दैवी आहे. संतोष देशमुख प्रकरणात सीआयडी चौकशी चालू आहे. या तपासात कोणीही सुटणार नाही'', अशी महत्त्वाची माहिती एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली. खासदार संजय राऊत यांनी आमचा कम्युनिकेशन गॅप झाला. त्यामुळे आधीची युती तुटली असं विधान केलं होतं. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर देत त्यांना आता आठवण झाली का? असा सवाल केला. ''बैल गेला आणि झोपा केल्या अशी अवस्था झाली आहे. तेलही गेलं आहे आणि तूपही गेलं आहे. पुढचं मी काही बोलत नाही. उपरती लवकर सुचली. २०१९ च्या निवडणुकीमध्ये राज्यातील जनतेने क्लिअर माईंडेड मतदान केलं होतं. पण काहींनी स्वार्थासाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले. त्यांना स्मारकाकडे निमंत्रण देणार नाही. स्मारक हे शासन बनवत आहे. बाळासाहेब हे एकट्याचे नाहीत. लोकनेते म्हणून या संपूर्ण महाराष्ट्रासाठी त्यांचे धोरण होते. ज्यांनी त्यांचे विचार सोडले त्यांना विधानसभेमध्ये लोकांनी धडा शिकवला. आता काय बोलून त्याचा उपयोग. जो बुंद से गई वो हौद से नही आती'', अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली.

# अंबाजोगाईच्या मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणवर हातोडा

## ४०-५० वर्षांपूर्वीची अनेक पक्की बांधकामे जमीनदोस्त, मुख्य रस्ता शंभर फुटांचा होणार

अंबाजोगाई, (प्रतिनिधी):- शहरातील चार पदरी रस्त्याचे काम पुर्णत्वाकडे येत असताना छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्वाराती रूग्णालय या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी मोहिम राबविण्यासाठी बांधकाम विभागाकडून अतिक्रमण धारकांना नोटीसा पाठविल्या. त्यांची मुदत आज संपल्यामुळे तगड्या पोलिस बंदोबस्तात आज सकाळी १० वाजता अतिक्रमण धारकांच्या घरावर बुलडोझर फिरले. यात बड्या लोकांच्या इमारतीबाबत भेदभाव केल्याचा आरोप स्थानिक राहिवाशांनी केला आहे. शहरातील रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी आ.नमिता मुंदडा यांनी कोट्यावधी रूपयांचा निधी आणला. शहरातील वाढती लोकसंख्या व वाहनांची संख्या लक्षात घेता रस्ते अपुरे पडू लागले होते. तसेच वाहनांची कोंडी हे नित्याचेच बनले होते. लहानमोठे अपघात झाले नाही असा एक दिवसही जात नव्हता. याची गंभीर दखल घेवून मुंदडा यांनी शासन दरबारी पाठपुरावा करून चौपदरीकरणासाठी निधी आणला. या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित अतिक्रमण धारकांना नोटीसा पाठवून आपआपले अतिक्रमण काढून घ्यावे असे फर्मान सोडले होते. परंतु काही नागरीकांनी या नोटीसीला बेदखल केले. आज सोमवारी सकाळी १० वाजता शहर पोलिस ठाण्यापासुन सुरू झालेली अतिक्रमण



मोहिम स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयापर्यंत फत्ते केली. परंतु सदर बाजार चौकापासून सुरू झालेले अतिक्रमण मोहिमेमुळे अनेकांची घरे पाडून बेघर केली. गरीबांची घरे पाडली, परंतु काही ठिकाणी ५० फुटाचे अंतर मोजताना भेदभाव केल्याचा स्थानिकांनी यावेळी प्रशानाकडे केला. अतिक्रमण काढणे हे स्वागतार्ह असले तरी नियम सर्वांना सारखा असायला पाहिजे होता. तो या मोहिमेतून दिसून आला नाही. असा आरोप स्थानिक रहिवाश्यांनी केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्वाराती रूग्णालय रस्त्यालगत असलेल्या अतिक्रमण धारकांची घरे काढण्यासाठी बांधकाम विभागाने तगडा पोलिस बंदोबस्त लावला होता. या बंदोबस्तातच सर्व अतिक्रमणे काढण्यात आली. किरकोळ प्रकार वगळता पोलिस बळाच्या बळावर ही मोहिम यशस्वी झाली. परंतु काहींच्या इमारतींना १०० फुटाचे अंतर मोजाना सुट दिल्याचे बोलल्या जात आहे. मागील चार वर्षापुर्वी प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी अजित कुंभार न.प.कार्यालयात प्रशिक्षणार्थी म्हणून एक महिना घेत असताना त्यांनी शहरातील अतिक्रमणावर मोहिम राबविली होती. या मोहिमेत सर्व अतिक्रमणे दुरू करून रस्ते मोकळे केले होते. त्यानंतर आता प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांनी मुख्याधिकारी पदाचा पदभार घेतल्यानंतर शहरातील अतिक्रमाणाची मोहिम राबविली. ती यशस्वी ही करून दाखविली. परंतु सध्या असलेल्या मुख्याधिकार्यांना अशा मोहिम का राबवाव्या वाटत नाहीत. असा प्रश्न सामान्य नागरिकांतून उपस्थित होवू लागला आहे. प्रशिक्षणाअर्थी जिल्हाधिकारी तथा मुख्याधिकारी अर्पिता ठुबे, पोलिस उपअधिक्षक अनिल चोरमले, शहर पोलिस ठाण्याचे शहर निरिक्षक विनोद घोळवे, दंगल नियंत्रक पथकाचे अधिकारी नगर पालिकेतील स्वच्छता निरिक्षक अनंत वेडे, सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता गौरी शंकर स्वामी, सहाय्यक अभियंता मुंडे, कनिष्ठ अभियंता गोविंद शेळके यांच्यासह प्रशासनातील अधिकारी व कर्मचार्यांचा मोठा सहभाग होता.

पान १ वरून

### वाल्मीक कराडवर...

झाला नाही. पोलिस आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. तपासात कुचराई करत आहेत. त्यांना विष्णू चाटे यांचा मोबाईल अद्याप हस्तगत करता आला नाही. ते आम्हाला तपासाची माहितीही देत नाहीत. या प्रकरणी काहीतरी लपवण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केला आहे. दरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सकाळीच मस्साजोगकडे धाव घेतली. बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत हे देखील घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी संतप्त महिलांनी पोलिसांना बांगड्या दाखविल्या. अखेर मनोज जरांगे पाटील आणि एसपी कॉवत यांनी मोबाईलवरून वांरवार देशमुख यांच्याशी बातचीत करून त्यांचे मनपरिवर्तन केले. त्यानंतर धनंजय देशमुख आणि त्यांचे सहकारी पाण्याच्या टाकीवरून खाली उतरले. या घटनेमुळे सकाळपासून मस्साजोग मध्ये अतिशय तणावाचे वातावरण आहे.

### खंडणी अन् हत्येचे...

निशाणा साधला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशमुख कुटुंबीयांच्या मागण्या खऱ्या मनाने मान्य केल्या पाहिजेत. ते गुंडांच्या टोळीला संरक्षणाची भींत घालून पीडित कुटुंबीयांशी दुजाभाव करू शकत नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे.

मस्साजोगच्या नागरिकांनी सोमवारी पाण्याच्या टाकीवर चढून आक्रमक आंदोलन केले. यात मयत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांचाही समावेश होता. त्यांनी आत्महत्या करण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे मनोज जरांगे यांनी स्वतः मस्साजोगला जाऊन त्यांना खाली उतरण्याचे आवाहन केले. त्यानंतर उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर घणाघात केला. मनोज जरांगे म्हणाले, संतोष देशमुख यांचा खून झाला. आता धनंजय देशमुख यांची या कुटुंबाला गरज आहे. आम्ही सर्वजण तुमच्या पाठिशी आहोत. तुम्ही आंदोलन करत आहात हे ऐकताच मी धावत पळत येथे आलो. तुम्ही एकटे समजू नका. आपल्याला हा लढा न्यायापर्यंत न्यायचा आहे. तुम्ही आत्महत्येसारखे चुकीचे पाऊल उचलू नका. हा साधासोपा विषय नाही. आम्हाला संतोष देशमुख यांना न्याय मिळवून द्यायचा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशमुख कुटुंबीयांच्या मागण्या खऱ्या मनाने मान्य करा. तुम्ही त्या गुंड आरोपींसाठी देशमुख कुटुंबीयांशी दुजाभाव करू शकत नाही. त्यांच्यावरील अन्यायाचे निराकरण करावे. मुख्यमंत्र्यांनी गुंडांच्या टोळीला संरक्षणाची भींत घालू नये. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत व पीडित कुटुंबीयांच्या भेटीवेळी खंडणी व हत्येचे आरोपी एकच असल्याचे सांगत कुणालाही न सोडण्याची ग्वाही दिली होती. त्यांच्या एका शब्दावर मराठा समाज शांत बसला. पण आता तपास यंत्रणेच्या तपासावर शंका येत आहे. या प्रकरणात खालच्या अधिकाऱ्यांचे हात भरल्याचा संशय आहे. त्यामुळे आता सर्व जबाबदारी मुख्यमंत्र्यांवर टाकण्याची वेळ आली आहे. त्यानुसार येथून पुढे या प्रकरणाचे सर्व यश, अपयश, दोष हे मुख्यमंत्र्यांचे असतील. एसआयटी, सीआयडी व पोलिस प्रशासनाने पीडित कुटुंबीयांना या प्रकरणाची हवी ती माहिती द्यावी. प्रस्तुत प्रकरणात खंडणीमुळेच खून झाला आहे. त्यामुळे खंडणीतील आरोपींवर हत्येचा गुन्हा दाखल करून त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात यावी. हा विषय सर्वसामान्य माणसांनाही समजतो. तो मुख्यमंत्र्यांना का समजत नाही? प्रशासनाने खंडणीतील आरोपींना मोकळे सोडले असेल तर कुटुंबीयांचा धीर सुटणार नाही तर काय होणार? असा सवालही मनोज जरांगे यांनी यावेळी उपस्थित केला. ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांचे पाऊल आता चुकीचे पडत आहे. ते बरोबर होते तेव्हा समाज शांत होता. पण आता त्यांना भेटूनही देशमुख कुटुंबीय हताश होत असेल तर हे त्यांचे अपयश आहे. हे सरकार खंडणीखोर चालवत आहे की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. लोक न्यायासाठी टाहो फोडत असताना तुम्ही हसत आहात. या प्रकरणातील एकही आरोपी सुटला तर आम्ही धनंजय मुंडे यांच्या टोळीचे जगणे अवघड करू. पोलिसांना अजून आरोपींचा मोबाईल सापडला नाही. त्यात खूप पुरावे आहेत. त्यामुळे त्यांनी तो मोबाईल फेकून दिला आहे. वाल्मीक कराड याला अजूनही ३०२ चा गुन्हा लावला नाही. तो पंतप्रधान मोदींपेक्षा मोठा आहे काय? असा सवालही जरांगे यांनी यावेळी उपस्थित केला.

### मुख्यमंत्र्यांचा एसपी-सीआयडी...

यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. आरोपींना काठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडच्या एसपी आणि सीआयडी अधिकाऱ्यांशी संपर्क करत एकही आरोपी सुटता कामा नये तसेच कोणावरही दयामाया दाखवू नका, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या आहेत. दरम्यान, संतोष देशमुख हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील मुख्य आरोपी विष्णू चाटे याला आज केज न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने विष्णू चाटेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी केज न्यायालयाने विष्णू चाटेची दोन दिवसांच्या सीआयडी कोठडीत रवानगी केली होती. त्याची सीआयडी कोठडी संपल्याने त्याला आज केज कोर्टात हजर करण्यात आले होते. आता त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. तसेच धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय मानला जाणारा वाल्मीक कराडवरही खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल आहे. सध्या तो पोलिस कोठडीत असून त्याची कोठडी उद्या संपणार आहे. त्यामुळे उद्या दुपारी त्याला केज न्यायालयात हजर केले जाईल. वाल्मीक कराडला पुन्हा किती दिवसांची कोठडी मिळते, हे पहावे लागणार आहे.

### धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर...

इकडे गेलो, तिकडे गेलो. खंडणीच्या आरोपीवर ११ तारखेला गुन्हा दाखल झाला. मात्र, १२ तारखेला बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, खंडणीतील आरोपी आणि पोलिस अधिकारी यांची बैठक झाली, असे म्हणत सोनवणे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर व पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. पुढे बोलताना बजरंग सोनवणे म्हणाले, माजी पालकमंत्र्यांच्या बंगल्यावर, त्यांच्या ऑफिसमध्ये खंडणीतील आरोपी आणि पोलिस अधिकारी यांची भेट झाली. म्हणजे पोलिसाला तिथे बसवून तो निघून गेला का? असा सवाल देखील बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केला आहे. बजरंग सोनवणे यांनी थेट नाव जरी घेतले नसले तरी देखील माजी पालकमंत्री म्हंटले तर धनंजय मुंडे हेच बीडचे माजी पालकमंत्री आहेत. त्यामुळे बजरंग सोनवणे यांनी त्यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. बजरंग सोनवणे म्हणाले, १२ डिसेंबरला बीडचे पालकमंत्री व खंडणीखोर आरोपीची पोलिस अधिकाऱ्यासोबत बैठक झाली. विशेष म्हणजे वाल्मिक कराडला पोलिसांची सुरक्षा आहे, तो कुठल्या पदावर आहे हे मला माहिती नाही. पण, त्यांनाही पोलिस गार्ड आहेत, हे गार्ड आरोपीसोबत कसे काय? असा प्रश्न बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केला आहे. ११ डिसेंबर रोजी खंडणीचा गुन्हा दाखल झाला, तेव्हापासून आरोपीला कोणी-कोणी मदत केली. ३१ डिसेंबरला अटक होईपर्यंत २१ दिवस आरोपीला ज्यांनी मदत केली, त्यांना सह-आरोपी का केले जात नाही, असेही सोनवणे म्हणाले. एसआयटीमधील नावे देखील आरोपीच्या सांगण्यावरून घेतली गेली असल्याचा सुद्धा आरोप बजरंग सोनवणे यांनी केला आहे. बजरंग सोनवणे म्हणाले, एसआयटी कधी नेमली गेली हेही तुम्ही पाहा, ज्या दिवशी आरोपी पोलिसांना शरण येतो. त्याच दिवशी एसायटी गठीत केली जाते, एसआयटीच्या टीमची नावे समोर येतात. म्हणजे, आरोपीला जे हवे ते पोलिस अधिकारी, कर्मचारी एसआयटीमध्ये घेतले गेले. राज्यपालांकडून एसआयटीतील अधिकाऱ्यांची नावे निश्चित केल्यानंतरच आरोपी पोलिसांना अटक झाला.

### शहरातील दोन्ही राष्ट्रीय...

राहुल कवठेकर,प्रा.पंडीत तुपे, शाहिर आनिल तिवारी, गौतम सोनकांबळे , पांडुरंग हराळे आदी सहभागी झाले होते. * नगर रोडवरील काम संथगतीने ; जागोजागी खड्डे , धुळीमुळे शासकीय कार्यालयात येणाऱ्यांना धुळीचा त्रास : बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ मार्गावरील शिरपूर फाटा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि बार्शी रोड ते जरूड फाटा असा १६० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक असलेल्या २४.५ किलोमीटरचा ९४ फुट रूंदीचा रस्त्याचे काम ३० जुन २०२३ रोजी सुरू करण्यात आले. नगररोडवर महत्वाची शासकीय कार्यालये जिल्हाधिकारी, जिल्हा न्यायालय, तहसिल, सामाजिक न्यायभवन, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग असुन दीड वर्षात केवळ १ किलोमीटरचे काम करण्यात आलेले आहे.रस्त्याचे काम अत्यंत संथगतीने असुन जागोजागी खोदलेले खड्डे यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे तर धुळीमुळे शासकीय कार्यालयात येणाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले असुन श्वसनाच्या आजारात वाढ झाली आहे. * धुळे ते सोलापूर मार्गावरील राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल सिमेंट रस्त्याचे काम अडीच वर्षांपासून अर्धवट ; पंखे भरले नाहीत,नाली बांधकाम नाही व दुभाजके अपुर्ण :बीड शहरातील धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल १८ कोटी रूपयांच्या सिमेंट रस्त्याचे काम करून अडीच वर्षं झाली मात्र साईडपंखे भरलेले नाहीत, नाल्यांची कामे नाहीत तसेच दुभाजकांचे काम अर्धवट असुन सिमेंट रस्त्यावरून येताना जाताना वाहने घसरून अपघाताचे प्रमाण वाढले आहे. ते काम पूर्ण करण्यात यावे. * बीड जिल्ह्यातील खामगाव -पंढरपुर , अहमदपूर ते अहिल्यानगर; पैठण ते पंढरपूर रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची आणि रखडलेल्या अवस्थेत : बीड जिल्ह्यातुन जाणारे राष्ट्रीय महामार्ग खामगाव ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील माजलगाव ते तेलगाव तसेच अहमदपूर ते अहिल्यानगर मार्गावरील लोखंडी सावरगाव ते मांजरसुंभा आणि पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील रस्ते काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने रस्त्यावर जागोजागी मोठमोठ्या भेगा पडल्याने दुचाकी वाहनांचे टायर अडकून अपघातात अनेक जण मृत्युमुखी पडलेले आहेत. संबंधित प्रकरणात जबाबदार कंत्राटदार आणि देखभाल करणा-या आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली आहे.

### धनंजय मुंडे-वाल्मिक...

आधारावर धनंजय मुंडे यांचा राजीनामाच घेतला पाहिजे. सीडीआरच्या आधारे तपास झाला पाहिजे. वाल्मिक कराडला फाशी झाल्याशिवाय स्थानिक जनता आणि आम्ही शांत बसणार नाही, असे संदीप क्षीरसागर यांनी म्हटले. वाल्मिक कराड हा माणूस इतरांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात पटाईत आहे. वाल्मिक कराड यांनी या प्रकरणात अटक होण्यासाठी वेळ घेतला. ते स्वत: सरेंडर झाले. वाल्मिक कराड याला अटक झाल्यानंतर संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या तपासाची सुई अडकल्यासारखी झालेली आहे. बाकी प्रशासन आणि पोलिसांचा तपास पळत आहे, असा आरोप संदीप क्षीरसागर यांनी केला. विष्णू चाटे याने संतोष देशमुख यांची हत्या केली. विष्णू चाटेचे कनेक्शन पूर्णपणे वाल्मिक कराड याच्याशी आहे. त्यामुळे वाल्मिक कराड याच्यावर ३०२ चा गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी क्षीरसागर यांनी केली.

### विष्णू चाटेला...

या प्रकरणातील महत्वाचा आरोपी असून, आज त्याला न्यायालयीन कोठडी मिळणार की, पोलिस कोठडी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष होते. केज न्यायालयात आज यावर सुनावणी पार पडली. न्यायालयाने अवघ्या काही मिनिटांतच विष्णू चाटेला न्यायालयीन कोठडी सुनावली. धक्कादायक म्हणजे आजच्या सुनावणीला सरकारी वकील बाळासाहेब कोल्ह हे अनुपस्थित राहिल्याची माहिती समोर येत आहे. या विषयी एका मराठी वृत्तवाहिनीच्या संकेतस्थळने वृत्त दिले आहे. धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय मानला जाणारा वाल्मीक कराड यांच्यावरही खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल आहे. सध्या तो पोलिस कोठडीत असून त्याची कोठडी उद्या संपणार आहे. त्यामुळे उद्या दुपारी त्याला केज न्यायालयात हजर केले जाईल. वाल्मीक कराडला पुन्हा किती दिवसांची कोठडी मिळते, हे पहावे लागणार आहे.

### काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाची...

कमांडकडून दिल्लीला तात्काळ बोलावण्यात आलं आहे, पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपदाची धुरा सोपवली जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागल्याने काँग्रेसकडून याची दखल घेतण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणून पृथ्वीराज चव्हाण यांच्या नावाला ग्रीन सिग्नल दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. भविष्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने हा निर्णय घेतल्याचं बोललं जात आहे. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला. काँग्रेसला केवळ १६ च जागा जिंकता आल्या, त्यानंतर आता काँग्रेसमध्ये घडामोडींना वेग आला आहे. पृथ्वीराज चव्हाण हे आता काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष होऊ शकतात. त्यांना हायकमांडकडून तातडीनं दिल्लीला बोलावण्यात आलं आहे, ते दिल्लीला रवाना देखील झाले आहेत. त्यामुळे पृथ्वीराज चव्हाण हे आता काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष बनवण्याची शक्यता आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त रक्तदान

## दहा वर्षापासुनची अविरत परंपरा : युवा भारत समुहाचा पौळाचीवाडी येथे संवाद मेळावा

**उमापूर । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील पौळाचीवाडी येथे युवा भारत समहाच्या वतीने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त गेल्या दहा वर्षापासून रक्तदान शिबीर व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाची परंपरा कायम सुरू आहे. सालाबादाप्रमाणे याहीवर्षी दि. १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १० रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून ज्येष्ठ समाजसेवक सुभाष काळे, उपक्रमशील शेतकरी विकास पठाडे, धाराशिव, संघर्ष धान्य बँकेचे अध्यक्ष शिवाजी झेंडेकर,सय्यद जावेद, हिवरे बाजार, तुकाराम तळतकर, मुख्याध्यापक सय्यद उपस्थित होते. गेवराई तालुक्यातील पौळाचीवाडी व परिसरातील युवक हे गेल्या दहा वर्षांपासून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करत आहेत. याहीवर्षी दि. १२ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता महापुरुषांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी व्यासपीठावरील सर्वच मान्यवरांनी १० वर्षांपासून चालत आलेल्या या रक्तदान व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे भरभरून कौतूक केले. तसेच गेल्या तीन वर्षापासून युवा भारत उद्योग समुहाच्या संवाद मेळाव्याचेही आयोजन करण्यात आलेले होते.




# स्वत:तील गुण दोषांची ओळख शेला पागोटे कार्यक्रमातून होतो: प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी व वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्ताने आयोजित विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य श्री. इं. ना. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ. राम शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या पारितोषिकांचे वाचन उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे यांनी केले. महाविद्यालयाकडून आदर्श प्राध्यापकासाठी दिला जाणारा कै. गयाबाई बाळकृष्ण पाटील पारितोषिक रोख रुपये ५०१ श्री. नागोराव वाघमारे यांना प्रदान करण्यात आला. तर विद्यार्थ्यांसाठी वाणिज्य शाखेतून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास मारोतीराव कुंभार पारितोषिक रुपये ५०१, कै. स्वातंत्र्यसैनिक नारायण मारोती कागदे पारितोषिक रुपये ५०१, कै. दीपक व राजेंद्र कुंभारे पारितोषिक रुपये १००० कु. तोष्णीवाल भाग्यश्री या विद्यार्थिनीने मिळविले. कै. फकीरराव ज्ञानबा सावंत पारितोषिक रुपये २५१ जाधव सुजाता यांनी, कै.जयदेव डोंगर सावंत पाटील पारितोषिक रुपये २५१, कै. यमुनाबाई अंबादास देशपांडे पारितोषिक रुपये २५१ कै. निवृत्ती सिद्राम गायकवाड पारितोषिक रुपये २५१ कु. श्रद्धा शेळके हिने प्राप्त केले. कै. शंकरराव निरोदिया स्वामी पारितोषिक बारावी वाणिज्य शाखेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास ५०१ रुपये बक्षीस ऋतुजा शंकर पवार या विद्यार्थ्याने मिळविले. कै. मथुराबाई विश्वनाथ चाळक पारितोषिक रुपये २५१ कला शाखेतून प्रथम आल्याबद्दल रत्नेश्वर लहू कसपटे या विद्यार्थ्याने मिळविले. कै. मंदोदरीबाई शंकरराव बागडे पारितोषिक बारावी विज्ञान शाखेतील प्रथम आलेली देवयानी धनंजय थोरात या विद्यार्थिनीने मिळविले.



# खांडे पारगाव हायस्कूलमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न) संचलित, खांडे पारगाव हायस्कूल खांडे पारगाव ता.जि.बीड या शाळेत मॉसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची संयुक्तरित्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सचिन पवार हे होते; तर सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम मॉसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

# श्री नारायण विद्यालयामध्ये राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा. महादेवराव काळे आण्णा यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुजन केले . प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर, श्री इनकर सर हे होते.विद्यार्थिनी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची वेशभूषा करून आले होते. कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी एका पेक्षा एक असे उस्फूर्त भाषणे केली. भाषण स्पर्धेत सहभाग घेणारे विद्यार्थी अनुष्का काशीद, भक्ती काळे, श्रेया सोलनकर, प्रिया बुधनर, श्रावणी रकटे, अर्चना अंगरखे, शुभांगी बहिर, लक्ष्मी पेठे, अक्षद बनसोडे. वेशभूषा स्पर्धेत प्रिया बुधनर , अंकिता माने, भक्ती काळे, नम्रता इनकर, अंजली सुरवसे, शुभांगी बहिर, अनुष्का काशीद, स्वप्नाली रकटे यांनी सहभाग नोंदवला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक श्री मुरमुडे सर यांनी केले तर सूत्रसंचालन सौ.भुतावळे मॅडम यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक रकटे बी.आर. सर यांनी मानले.

# भीमराव पौळ यांचे निधन



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदगाव येथील ज्येष्ठ नागरिक भीमराव खंडू पौळ वय ८० वर्ष यांचे रविवार रोजी सायंकाळी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्यावर सोमवार रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यापेक्षा पत्नी,दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. कष्टकरी अण्णा सर्व परिचित होते

# टेनिस बॉल क्रिकेट व रोल बॉलच्या विभागीय शालेय स्पर्धेमध्ये गुरुकुल इंग्लिश स्कूलचे सुयश



**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा कार्यालय बीड व टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विभागीय स्पर्धा संपन्न झाल्या. या विभागीय स्पर्धेमध्ये गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या दोन संघांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी दोन्ही संघांनी विभाग या स्पर्धेमध्ये अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम पारितोषिक पटकावले. तसेच रोल बॉलच्या विभागीय क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल येथे संपन्न झाल्या. या विभागीय स्पर्धेमध्येही गुरुकुलच्या १४ वर्षाखालील मुले व १७ वर्षाखालील मुलांच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम पारितोषिक पटकावले. वरील विजयी झालेले चारी संघ पुढे होणार्या शालेय राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विजयी झालेल्या संघातील खेळाडू टेनिस बॉल क्रिकेट १७ वर्षाखालील मुले सार्थक कोकरे, अन्वित सुभेदार, आरशान पठाण, शशांक सारंगकर, सक्षम वारंगुळे, गौरव अनमुलवार, सहर्ष धांडे, अविष्कार कळसुळे, गौरव शिंदे, दीप काळे, संग्राम तळेकर, संविधान सावते, आर्यन गदळे, रोहन शिंदे तर १७ वर्षाखालील मुली गौरवी परळकर, संस्कृती गर्जे, स्वराली जायभाये, संस्कृती धुत, सृष्टी वक्रे, श्रेया कुटे, सानिका खेडकर, श्रुती राख, स्वरा गवते, सृष्टी जाधव, सही शिंदे, अनन्या काळवणे या खेळाडूंनी विभागीय स्पर्धेमध्ये अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम पारितोषिक पटकावले. तसेच रोल बॉल संघामधील विजय खेळाडू अर्जुन कोंडेकर, वेदांत थिटे, अर्णव कुलकर्णी, यश नेरकर, स्वराज गायकवाड.


## जाहीर प्रगटन

**कार्यालय, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता. बीड**

दि.१३/०१/२०२५

या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता.बीड यांचे वतीने **अभिमान अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड** या संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक सन २०२५–२०३० करीता संस्थेने सादर केलेली प्रारूप यादी दि. १३/०१/२०२५ पासून प्रसिध्द करण्यात आली आहे. दि.२०/०१/२०२५ पर्यंत सदर यादीवर आक्षेप मागविण्यात आले आहेत. दि. २७/०१/२०२५ रोजी यादीवर प्राप्त झालेल्या आक्षेपांबाबत सकाळी ११.०० वा सुनावणी घेवून त्याच दिवशी सायंकाळी ५.०० अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे तरी याची सर्वसंबंधीतांनी नोंद घ्यावी.

(स्वाक्षरीत)
**(एस.बी. घोडके)**
**तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता. बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी. पाटील ६ वे सह, दिवाणी न्यायाधीश. व. स्तर बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर १८२२/२०२५**
**बन्सीसलाल सिताराम मस्के विरूध्द निरंक**

अर्जदार – बन्सीसलाल सिताराम मस्के, वय: ७२ वर्षे, धंदा पेन्शनर व शेती, रा.आदर्श कॉलनी, संभाजीनगर, शिवधाम, अकोला, ह.मु. वासनवाडी, ता.जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार– निरंक

मागणी : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत कचराबाई सिताराम मस्के व सिताराम कोंडीबा मस्के** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **कचराबाई सिताराम मस्के यांचा मृत्यु दि. १५/०८/२००५ रोजी व सिताराम कोंडीबा मस्के यांचा मृत्यू दिनांक १५/०६/२०१९ रोजी** दोघेही वासनवाडी, ता. जि. बीड. येथे मयत झालेले असून अर्जदार हा मयताचा मुलगा असून, अर्जदार हा एकमेव वारस आहे.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू कचराबाई सिताराम अर्जदार हयांचे हक्काबदद्ल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयन मस्के व सिताराम कोंडीबा मस्के यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९ माहे ०१ सन २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०३/०२ / २०२५ आहे.**

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

(स्वाक्षरीत)
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**कार्यालय, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता. बीड**

दि.१३/०१/२०२५

या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता.बीड यांचे वतीने **शिवछत्रपती अर्बन को–ऑप क्रेडीट सोसायटी लि. बीड** या संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक सन २०२५–२०३० करीता संस्थेने सादर केलेली प्रारूप यादी दि. १३/०१/२०२५ पासून प्रसिध्द करण्यात आली आहे. दि.२०/०१/२०२५ पर्यंत सदर यादीवर आक्षेप मागविण्यात आले आहेत. दि. २७/०१/२०२५ रोजी यादीवर प्राप्त झालेल्या आक्षेपांबाबत सकाळी ११.०० वा सुनावणी घेवून त्याच दिवशी सायंकाळी ५.०० अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे तरी याची सर्वसंबंधीतांनी नोंद घ्यावी.

(स्वाक्षरीत)
**(एस.बी. घोडके)**
**तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता. बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**कार्यालय, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता. बीड**

दि.१३/०१/२०२५

या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता.बीड यांचे वतीने **संगमेश्वर महिला अर्बन को–ऑप क्रेडीट सोसायटी लि. बीड** या संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक सन २०२५–२०३० करीता संस्थेने सादर केलेली प्रारूप यादी दि. १३/०१/२०२५ पासून प्रसिध्द करण्यात आली आहे. दि.२०/०१/२०२५ पर्यंत सदर यादीवर आक्षेप मागविण्यात आले आहेत. दि. २७/०१/२०२५ रोजी यादीवर प्राप्त झालेल्या आक्षेपांबाबत सकाळी ११.०० वा सुनावणी घेवून त्याच दिवशी सायंकाळी ५.०० अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे तरी याची सर्वसंबंधीतांनी नोंद घ्यावी.

(स्वाक्षरीत)
**(एस.बी. घोडके)**
**तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता. बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**कार्यालय, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता. बीड**

दि.१३/०१/२०२५

या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता.बीड यांचे वतीने **येडेश्वरी महिला नागरी सहकारी पतसंस्था म. बीड** या संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक सन २०२५–२०३० करीता संस्थेने सादर केलेली प्रारूप यादी दि. १३/०१/२०२५ पासून प्रसिध्द करण्यात आली आहे. दि.२०/०१/२०२५ पर्यंत सदर यादीवर आक्षेप मागविण्यात आले आहेत. दि. २७/०१/२०२५ रोजी यादीवर प्राप्त झालेल्या आक्षेपांबाबत सकाळी ११.०० वा सुनावणी घेवून त्याच दिवशी सायंकाळी ५.०० अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे तरी याची सर्वसंबंधीतांनी नोंद घ्यावी.

(स्वाक्षरीत)
**(एस.बी. घोडके)**
**तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता. बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**कार्यालय, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता. बीड**

दि.१३/०१/२०२५

या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता.बीड यांचे वतीने **ईश्वरी अर्बन को–ऑप क्रेडीट सोसायटी लि. बीड** या संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक सन २०२५–२०३० करीता संस्थेने सादर केलेली प्रारूप यादी दि. १३/०१/२०२५ पासून प्रसिध्द करण्यात आली आहे. दि.२०/०१/२०२५ पर्यंत सदर यादीवर आक्षेप मागविण्यात आले आहेत. दि. २७/०१/२०२५ रोजी यादीवर प्राप्त झालेल्या आक्षेपांबाबत सकाळी ११.०० वा सुनावणी घेवून त्याच दिवशी सायंकाळी ५.०० अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे तरी याची सर्वसंबंधीतांनी नोंद घ्यावी.

(स्वाक्षरीत)
**(एस.बी. घोडके)**
**तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था ता. बीड**

शिक्का

# नेत्रदीपक वातावरणात ॲथलेटिक्स स्पर्धेने झाला क्रीडा महोत्सवाचा समारोप

## प्रकाश झोतात खेळले गेले अंतिम सामने










**गेवराई । प्रतिनिधी**

शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या नेतृत्वाखाली जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत सुरु असलेल्या क्रिडा महोत्सवाचा समारोप शिवशारदा पब्लिक स्कूलच्या भव्य मैदानावर थलेटिक्सच्या अंतिम सामन्याने करण्यात आला. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात, जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयसिंग पवार पंडित, गेवराई बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, गेवराई पोलीस स्टेशनचे पोलीस सहाय्यक निरीक्षक संतोष जंजाळ, जयभवानी साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे, युवानेते पृथ्वीराज पंडित, शिवशारदा मल्टिस्टेटचे सरव्यवस्थापक रणजित पंडित, प्राचार्या श्रीमती शिल्पा क्षिरसागर, बीट अंमलदार अशोक हंबलडे यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रकाश झोतात आणि नेत्रदीपक कार्यक्रमात क्रिडा महोत्सवाचा समारोप करण्यात आला. यावेळी थलेटिक्स स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर क्रीडा ज्योत प्रज्वलीत करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध थलेटिक्सच्या अंतिम सामन्यांचा प्रारंभ करण्यात आला. लांब उडी, गैळा फेक, धावणे, मिक्स रिले या प्रकारच्या स्पर्धा झाल्या. यावेळी विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावणी खरात, श्रद्धा कदम, अदिती दातखीळ, सिद्धांत निकम यांनी केले. जिजाऊ जयंतीच्या निमित्ताने भविष्या गाढवे हीने जिजाऊंची वेशभुषा करुन उपस्थितांची मने जिंकली. यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासनाधिकारी प्रा गोगुले, मुख्याध्यापक वसंत राठोड, राजेंद्र जगदाळे, अनंत डावकर, कार्यक्रमाला सर्व मुख्याध्यापक, क्रीडाशिक्षक विद्यार्थी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ॲथलेटिक्स स्पर्धांचे विजेते– १४ वर्ष वयोगट (लांब उडी)मुले यशवंत लेंडगुळे, शारदा विद्या मंदिर गेवराई (प्रथम) यशराज तिपाले, शिव शारदा पब्लिक स्कूल (द्वितीय),चैतन्य नैराळे, माध्यमिक विद्यालय खळेगाव (तृतीय) तर मुलींमध्ये कोमल जाधव, मालेगाव (प्रथम) संस्कृती करांडे, शिव शारदा पब्लिक स्कूल (द्वितीय) तृप्ती दहिफळे, माध्यमिक विद्यालय घोगस पारगाव (तृतीय)

१७ वर्ष वयोगट (लांब उडी)– मुले आर्यन नवले, शारदा विद्या मंदिर गेवराई(प्रथम) सागर तांगडे, शिव शारदा पब्लिक स्कूल (द्वितीय) आतिश पवार, माध्यमिक विद्यालय मारफळा ( तृतीय) मुलींमध्ये संस्कृती ननवरे, शिव शारदा पब्लिक स्कूल (प्रथम) ज्योती तागड, जय भवानी माध्यमिक विद्यालय (द्वितीय), ऋतुजा शिंदे, माध्यमिक विद्यालय सिरसदेवी (तृतीय), १४ वर्ष वयोगट (गोळा फेक)मुले यशराज चनेबोईनवाड, शारदा विद्या मंदिर गेवराई(प्रथम) तनय शिंदे, शिव शारदा पब्लिक स्कूल (द्वितीय) श्रेयश लव्हाळे शारदा विद्या मंदिर गेवराई (तृतीय), मुलींमध्ये प्रवीण शेख, माध्यमिक विद्यालय खळेगाव (प्रथम) गायत्री धांडे, माध्यमिक विद्यालय रामपुरी (द्वितीय)

## रब्बी ई–पीक पाहणी शेवटची तारीख १५ जानेवारी; शेतकऱ्यांनो नोंदणी करूनच घ्या

**बीड । प्रतिनिधी**

रब्बी हंगाम २०२४ ई पीक पाहणी शेवटची तारीख जवळ आलेली आहे. सर्व शेतकऱ्यांना विनंती आहे की शेतकरी स्तरावरील ई पीक पाहणीची शेवटची तारीख १५ जानेवारी २०२५ करण्यात आली आहे तरी ज्या शेतकऱ्यांनी अदयाप ई पीक पाहणी केली नाही त्यांनी लवकर आपल्या पिकांची नोंद ई पीक पाहणी ॲप्लिकेशन मध्ये करून घ्यावी. असे आवाहन संचालक धनंजय गुंदेकर यांनी केले आहे.

ई पीक पाहणीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना खालील फायदे होतात. ई – पीक पाहणी मुळे शेतकरी आपल्या पिकांची नोंद सातबारा ७/१२ यावर करु शकणार आहे. आपल्या शेतातील बांधावरील झाडाची नोंद करता येणार आहे. नुकसान झाल्यास शेती पिका संबधीत अनुदान मिळण्यास या नोंदणीची मदत होते.पिक नुकसान झाल्यास मिळणारा विमा साठी अर्ज करताना नोंदवलेलं पीक आणि ई–पीक पाहणीत नोंदवलेलं पीकच ग्रहीत धरण्यात येईल.ई–पीक पाहणी' मुळे शेतकऱ्यांच्या पिकाची व पेरणीची योग्य तीच नोंद होणार आहे. हमीभावने ज्वारी, हरभरा व इतर पिके विकायची असतील तर ई पीक पाहणी वर नोंद लागते. कूपनलिका, विहीर नोंद ई पीक पाहणी द्वारे होते म्हणून ई पीक पाहणी रब्बी करून घ्यावी असे आवाहन संचालक धनंजय गुंदेकर यांनी केले आहे.







*नेकनूर : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांद्रळवाडी घाट शाळेत राजमाता माँसाहेब जिजाऊ भोसले व हिंदू धर्म प्रसारक स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित शिक्षक वृंद व विद्यार्थी*

## समाजशील व्यक्तिमत्व घडविणारी कार्यशाळा म्हणजे एनएसएस शिबीर : संदीप पालवे

**पाथर्डी । प्रतिनिधी**

स्वतः साठी काम करत असताना सामाजसेवेसाठीसुद्धा सर्वानी आपला थोडा वेळ राखून ठेवला पाहिजे. सकारात्मक दृष्टीकोण हा आयुष्य घडवत असताना खूप महत्वाचा घटक असतो. आयुष्य जगत असताना चांगले मित्र बनवा. आई वडील आणि गुरुजन यांचा आदर करूनच आपण घडत असतो. अभ्यासू ज्ञानापेक्षा प्रात्यक्षिक ज्ञान महत्वाचे ठरते आणि हे काम राष्ट्रीय सेवा योजना करते. म्हणून सकारात्मक दृष्टीकोणासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्वाची आहे समाजशील व्यक्तिमत्व



घडविणारी कार्यशाळा म्हणजे एनएसएस शिबीर होय असे प्रतिपादन व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ संदीप पालवे यांनी केले. येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या एन.एस.एस.विभागाच्या वतीने आयोजित श्री क्षेत्र मोहटादेवी येथे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष एड. सुरेशराव आव्हाड, प्राचार्य डॉ. बबन चौरे, , उपसरपंच अविनाश फुंदे, मुख्यध्यापक जगन्नाथ बडे, आदी उपस्थित होते.

## ब्रह्मसखी महिला मंडळाचे बुधवारी हळदी – कुंकू: नारीशक्ती एकवटली

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील ब्रह्मसखी महिला मंडळाच्या वतीने मकरसंक्रांतीनिमीत्त एकत्रीत हळदी – कुंकू कार्यक्रमाचे आयोजन दि. १५ बुधवारी वैष्णवी मंगल कार्यालयात करण्यात आले असुन शहरातील महिला – भगिनींनी हळदी – कुंकूवास अवर्जुन यावे असे आवाहन या ब्रह्मसखी महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. शहरामध्ये मागील तिन वर्षांपासुन ब्रह्मसखी महिला मंडळ हे सामाजिक उपक्रम राबवितात तर उपनयन संस्कार कार्यक्रमामध्ये देखील उत्स्फुर्त सहभाग असतो.

**ब्रह्मसखी महिला मंडळाचे हळदी – कुंकूवासोबतच महिलांसाठी सेल्फी पॉईंट विवीध प्रकारचे आधुनिक खेळ याठिकाणी आयोजित केले आहेत.**

यावर्षी मकरसंक्रांतीनिमीत्त पहिल्यांदाच शहरातील ३६९ महिलांनी एकत्रीत येवुन हळदी – कुंकू कार्यक्रमाचे आयोजन वैष्णवी मंगल कार्यालयात बुधवारी दु. ३.०० ते सायं. ८.०० पर्यंत करण्यात आले असुन या कार्यक्रमास महिला – भगिनींनी उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

## डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी सहभागी व्हावे : प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

### सेलु येथे पुरस्कार वितरण सोहळा

**वडवणी । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषद आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि भव्य राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन येत्या १ फेब्रुवारी २०२५ रोजी सेलू या ठिकाणी करण्यात आले असून या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि सदस्यांनी आवर्जून उपस्थित रहावे.असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष



अनिल वाघमारे यांनी केले आहे.

मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेली ही डिजिटल मिडिया परिषद आहे. महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हा आणि तालुका पदाधिकारी व सदस्यांनी या मेळाव्यात सहभागी होणे बंधनकारक आहे. डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष संतोष शिंदे, उपाध्यक्ष अनिल उंबरकर, प्रदेश सदस्य अनिल धुपदाळे कोल्हापूर ,प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाठ बीड मराठवाडा,प्रदेश सदस्य तानाजी जाधव सांगली, प्रदेश सदस्य मल्हार पवार कर्जत रायगड, प्रदेश सदस्य शेख अफताब अहिल्याबाईनगर या सर्व राज्यस्तरीय पदाधिकारी यांनी जबाबदारी घ्यावी.आपणास व इतर पदाधिकारी यांचे काही म्हणणे असल्यास आम्हाला ९८२२५४८६९६ या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा असे आवाहनही डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

## महात्मा ज्योतीबा फुले विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी




**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील महात्मा ज्योतीबा फुले माध्यमिक विद्यालय माजलगाव येथे एक तुकडी एक उपक्रम अंतर्गत ८वी अ च्या वतीने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

दिनांक १२ जानेवारी रोजी शाळेला सुट्टी असल्यामुळे दिनांक १३ जानेवारी रोजी शाळेतील ८ वी अ मधील विद्यार्थ्यांच्या वतीने हा जन्मोत्सव साजरा करण्यात आला असता सुत्रसंचलन कु. भाग्यश्री शेजूळने केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. समिक्षा चव्हाण हिने केले , सय्यद सायमा अन् सिद्धी बोबडे यांनी पूष्पगुच्छ तयार केले व सिद्धी बोबडे हिने जिजाऊंची वेशभुषा धारण केली होती. पूणम लांबुड , प्रतिक्षा गावडे , बालाजी गवळी , नैतिक कस्बे , शशिकांत एखंडे यांनी भित्तिपत्रिका तयार केल्या होत्या. अनन्या भाग्यवंत व अक्षरा कर्डीले यांनी जिजाऊ वंदना गायली तर चि. प्रसेनजित अमर साळवे याने स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले व ८ वी अ मधील सर्व विद्यार्थांचे प्रतिनिधित्व केले. या जयंती निमित्त प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका धसकटे मॅडम , पर्यवेक्षक मोरेश्वर मसलेकर सर व किरण देशमुख सर यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती प्रसंगी सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## १४ जानेवारी पासून आरटीई प्रवेशासाठी करता येणार अर्ज : मनोज जाधव

### जिल्ह्यात आरटीई तून ३५ शाळा घटल्या; २१४ शाळांची नोंदणी; २ हजार २३५ विद्यार्थ्यांना मिळणार इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश



**पालक आपल्या पाल्याचा आरटीई प्रवेश प्रक्रियेच्या अधिकृत https://student.maharashtra.gov.in/admšportal या संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज भरू शकता.**

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या पाल्याना देखील उच्च प्रतीचे शिक्षण मिळावे अशी इच्छा गोरगरीब ,गरजू पालकांची असते. यासाठीच शासनाच्या वतीने राईट टू एज्युकेशन (आरटीई)अंतर्गत प्रवेश दिले जातात. आरटीई प्रवेश प्रक्रियेचा शाळा नोंदणीचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. आता प्रत्येक्षात पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांना दि १४ जानेवारी पासून ऑनलाईन अर्ज करता येणार आहेत. जिल्ह्यातील २१४ खासगी शाळांनी आरटीई पोर्टलवर नोंद केली असून २ हजार २३५ जागा आरटीई प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. आरटीई अंतर्गत मोफत प्रवेशासाठी पाल्याच्या पालकांनी ऑनलाईन अर्ज करावेत असे आव्हान आरटीई कार्यकर्ते तथा शिवसंग्रामचे युवा नेते मनोज जाधव यांनी केले आहे.

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) राबविल्या जाणाऱ्या २५ टक्के आरक्षित जागांवरील प्रवेश देण्याची प्रक्रिया १४ जानेवारी पासून सुरू केली जाणार असल्याचे परिपत्रक राज्याचे प्राथमिक शिक्षण संचालक कार्यालया कडून प्रसिद्ध केले आहे. त्यामुळे आरटीई प्रवेशाच्या प्रतिक्षेत असलेल्या पालकांना आपल्या पाल्याच्या प्रवेशाचा अर्ज येत्या १४ ते २७ जानेवारी पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येणार आहे. आर्थिक दुर्बल आणि वंचित घटकांतील गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हक्क कायद्यानुसार पहिली ते आठवीसाठी इंग्रजी शाळांमध्ये मोफत शिक्षणाची विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध केली जाते. प्रवेशित विद्यार्थ्यांचे शुल्क सरकारमार्फत संबंधित शाळांना शुल्क प्रतिपूर्तीद्वारे देण्यात येते. अशी माहिती मनोज जाधव यांनी दिली आहे.

## अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड पासूनच जवळ असलेल्या खापर पांगरी येथे कैवल्य सम्राट चक्रवर्ती श्री ज्ञानोबाराय यांचा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा व कलश रोहन कार्यक्रमानिमित्ताने दिनांक २४/१/२०२५ शुक्रवार पासून प्रेम मूर्ती ह भ प महंत शिवाजी महाराज श्रीक्षेत्र नारायण गडकर यांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने या नाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे .या नाम सप्ताहमध्ये काकडा ,भजन विष्णू सहस्त्रनाम ,भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, व हरीपाठाचे आयोजन करण्यात आलेले आहे .याबरोबरच बीड जिल्ह्यातील नामवंत कीर्तनकार महाराज मंडळींची कीर्तन हरी किर्तनसेवा आयोजित केलेली आहे .यामध्ये ह भ प महादेव महाराज राऊत ,ह भ प शिवाजी महाराज मिसाळ ,ह भ प हनुमान महाराज डांबे ,ह भ प कृष्णा महाराज राऊत ,ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती नेकनुर, ह भ प पांडुरंग महाराज साळुंके, ह भ प पंडित महाराज क्षीरसागर या महाराज मंडळींची सुश्राव्य अशी हरिकीर्तन सेवा संपन्न होणार आहे.

## नरेंद्रचार्य महाराजांचा अंबाजोगाई येथे पादुका दर्शन सोहळ्याचा प्रचाराच्या शुभारंभ



**बीड । प्रतिनिधी**

२८ जानेवारी रोजी होणाऱ्या आंबेजोगाई येथील पादुका दर्शन सोहळ्याच्या निमित्ताने आज प्रचाराच्या गाड्यांचा मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला, आंबेजोगाई तालुक्यातील व संपूर्ण बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावागावांमध्ये जाऊन जगद्गुरु माऊलींचा प्रचार प्रसार करण्यासाठी सर्व भक्तगण अहोरात्र मेहनत घेत आहेत, एक गाव असे राहणार नाही की त्या गावांमध्ये प्रचार प्रसार झाला नाही असे जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज भक्त सेवा मंडळांचे व पदाधिकाऱ्यांचे नियोजन आहे त्या दृष्टिकोनातून आज सर्व गाड्या ज्या ठिकाणी पादुका दर्शन सोहळा होणार आहे त्या मैदानावर बोलून घेऊन त्यांचे विधीवत मान्यवरांच्या हस्ते पूजन करून प्रचार प्रचाराला सुरुवात करण्यात व सर्व जिल्हा सेवा समितीच्या वतीने बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांना २८ जानेवारी रोजी होणाऱ्या पादुका दर्शन सोहळ्याच्या कार्यक्रमाला हजर राहण्याचे आवाहन केले आहे या निमित्ताने आंबेजोगाई तालुक्याची पूर्ण तालुका सेवा समिती, संतसंग अध्यक्ष तसेच आंबेजोगाई शहरातील प्रतिष्ठित नागरिक मान्यवर व बीड जिल्हा सेवा समिती या उद्घाटन समयी हजर होते.

